कवीला शंका येते

तेव्हा

त्यातून

अज्ञाताची दारे उघडतात.

कवीला प्रश्न पडतात

तेव्हा

आकाशभर उत्तरांचे पर्याय उगवतात.

कवीला कल्पना सुचतात

तेव्हा

आपल्याही जीवनाचे अर्थ बदलतात.

कवीला वेदना होतात

तेव्हा

पुनश्च नवे वेद लिहिले जातात.

कवीला मृत्यूवैभव कळते

तेव्हा

तेव्हा नव्या विश्वाची नांदी होते.